Publication: Saka
Date: 13/3/2020
Page: 3
Column: 4

सकाळ मुंबई, शुक्रवार, १३ मार्च २०२०

# अदाणी इलेक्ट्रिसिटीतर्फे ग्राहक सुरक्षा सप्ताह

3/4

मुंबई, ता. १२ : अदाणी इलेक्ट्रिसिटीतर्फे नुकताच राष्ट्रीय सुरक्षितता सप्ताह साजरा करण्यात आला. या सोहळ्याअंतर्गत कुर्ला येथील बैलबाजारातील रहिवाशांना विजेसंदर्भातील धोके व सुरक्षितता या विषयांवर माहिती देण्यात आली. अदाणीतर्फे आठवडाभर वेगवेगळ्या ठिकाणी अशी जागरूकता शिबिरे घेण्यात आली.

राष्ट्रीय सुरक्षितता परिषदेने सुरू केलेल्या या चळवळीने यंदा आपला ४९ वा स्थापनादिन साजरा केला. यानिमित्ताने हा सप्ताह साजरा करताना अदाणी इलेक्ट्रिसिटीच्या तंत्रज्ञांनी आधुनिक तंत्रज्ञान असलेली उपकरणे वापरताना घ्यावयाची सुरक्षितता याबाबत रहिवाशांचे प्रबोधन केले. विजेची उपकरणे, प्लग-स्वीच कसे हाताळावेत, उपकरणे व्यवस्थित नसल्याचा संशय आल्यास काय करावे, आर्थिंग याबाबत माहिती दिली. वायरिंग-स्वीच यातील दुरुस्त्या-बदल या बाबी रहिवाशांनी न करता मान्यताप्राप्त तंत्रज्ञामार्फतच करावे, असेही यावेळी सांगण्यात आले. या शिबिराचा कुर्ला येथील बैलबाजार परिसरातील हजारो रहिवाशांनी लाभ घेतला. या उपक्रमाचा आपणास नक्कीच लाभ होईल अशी प्रतिक्रिया अनेकांनी व्यक्त केली.